RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष १०, अंक १०] गुरुवार, जानेवारी १८, २०२४/पौष २८, शके १९४५ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १५.००

असाधारण क्रमांक १०

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### विधि व न्याय विभाग

५ वा मजला, मुख्य इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १७ जानेवारी, २०२४.

### अधिसूचना

महाराष्ट्र दिवाणी न्यायालय अधिनियम.

क्रमांक न्यायस्था-०८१९/६५०/प्र.क्र.१५१/कार्या-११.— महाराष्ट्र दिवाणी न्यायालय अधिनियम (१८६९ चा १४) याच्या कलम २१, २२अ व २३ यांद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा, आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, आणि याबाबतीत यापूर्वी काढलेल्या इतर सर्व अधिसूचना, जेथवर त्या पुणे जिल्हा न्यायालयास दुय्यम असलेल्या पुणे जिल्ह्यातील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, बारामती यांच्या न्यायालयाशी संबंधित असतील तेथवर, त्यांमध्ये अंशतः फेरबदल करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, असे निदेश देत आहे की, दिनांक २० जानेवारी, २०२४ पासून,—

(क) पुणे जिल्ह्यातील दौंड येथे, जिल्हा न्यायालय, पुणे यास दुय्यम असलेले एक दिवाणी न्यायालय असेल ;

(ख) दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर हे उक्त न्यायालयाचे पीठासीन अधिकारी असतील आणि ते दौंड येथे त्यांचे न्यायालय भरवतील ; आणि

(ग) दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, दौंड, जिल्हा पुणे यांच्या सर्वसाधारण अधिकारितेच्या सीमांमध्ये, पुणे जिल्ह्यातील दौंड या महसुली तालुक्याचा समावेश असेल आणि यापूर्वी दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, बारामती यांच्या सर्वसाधारण अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये समाविष्ट असलेला सदर तालुका त्यामधून वगळण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विलास वसंत गायकवाड,**
शासनाचे विधि सल्लागार-नि-सहसचिव.





COURT BOO
EMPOWERING LEGAL CLARI
Scanned with CamScanner

COURT BOO
EMPOWERING LEGAL CLARI

LAW AND JUDICIARY DEPARTMENT

5 th floor, Main Building, Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032, dated the 17th January, 2024.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA CIVIL COURTS ACT.

No. NYAYASTHA-0819/650/C.R.151/Desk-11.- In exercise of the powers conferred by sections 21, 22A and 23 of the Maharashtra Civil Courts Act (XIV of 1869), and of all other powers enabling it in this behalf; and in partial modification of all the earlier notifications issued in this behalf, in so far as they relate to the Court of Civil Judge, Senior Division, Baramati in Pune District, sub-ordinate to the District Court of Pune, the Government of Maharashtra, hereby directs that, with effect from 20 January, 2024,—

(*a*) there shall be a Civil Court at Daund, sub-ordinate to the District Court Pune, in Pune District ;

(*b*) the said Court shall be presided over by the Civil Judge Senior Division who shall hold his Court at Daund ; and

(*c*) the local limits of the ordinary jurisdiction of the Civil Judge Senior Division, Daund, Pune shall comprise the areas covered within the local limits of the Revenue Tahsil of Daund in Pune District and work from the said Tahsil which was heretofore included within the local limits of the ordinary and special jurisdiction of the Civil Judge Senior Division, Baramati in Pune District shall be excluded therefrom.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VILAS VASANT GAIKWAD,
Legal Advisor-*cum*-Joint Secretary to Government.

Scanned with CamScanner